क्रमांक एलआरएफ-२६९८/८८४/प्र.क्र.७५७८/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २२ सप्टेंबर १९९९

विषयः- जमीन मुंबई उपनगर जिल्हा
मौजे आंबिवली स.नं. १४१/अ येथील भूखंड क्र.१८ ते २० च्या उत्तरेकडील भूखंड क्र. ७५ ते ७७ च्या दक्षिणेकडील दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रालगतचा १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळास कम्युनिटी सेंटरसाठी मंजूर करण्याबाबत.

**शासन ज्ञापनः**

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या पत्र क्रमांक कार्या- ३डी/वशि-४२१/ ९९, दि. २८ जून १९९९ च्या पत्राने संपणा-या पत्रव्यवहारास अनूलक्षून असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, विषयाधीन जमीन सिंधुदूर्ग शिक्षण प्रसारक मंडळास कम्युनिटी सेंटरसाठी देण्याबाबत दिनांक ५ मे ९९ रोजी हेतूपत्र देण्यात आलेले आहे. याबाबत शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मौ. आंबिवली स.नं. १४१ अ येथील भूखंड क्र. १८ ते २० च्या उत्तरेकडील व भूखंड क्र. ७५ ते ७७ च्या दक्षिणेकडील दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राच्या लगतचा सुमारे १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड सिंधुदूर्ग शिक्षण प्रसारक मंडळास दिनांक ८.२.८३ व ११.५.८४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीवर (महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे नियम १९७१ च्या तरतूदीनुसार ) दिनांक १.२.७६ चे तात्पुरते मुल्यांकन रु. २००/- प्रति चौ.मी. मानून त्यानुसार जमिनीच्या होणा-या एकुण किंमतीच्या २५ टक्के रकमेवर शा.परि.,म.व.व.वि.क्र. जमीन-१०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक ६.८.९९ मधील तरतूदीनुसार विहित दराने भुईभाडे आकारुन कम्युनिटी सेंटर उभारण्यासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टीने पुढील अटी शर्तीवर मंजूर करण्यात यावा.

१) नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाने निश्चित केलेले अंतिम मुल्यांकन तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरणा करण्यास जिल्हाधिका-यांनी कळविल्यापासून १ महिन्यात भरणा करण्यास तयार असल्याचे हमीपत्र संस्थेकडून घ्यावे.

२) भाडेपट्टयाच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणा करण्यात यावी.

३) संकल्पित बांधकामाच्या प्रकल्पाचा सविस्तर तपशिल संस्थेने तात्काळ जिल्हाधिका-यांना पुरवावा.

कृ.मा.प.

४) सदर संस्था सर्व जातीधर्माच्या व्यक्तींसाठी खुलीअसली पाहिजे.

५) जिल्हाधिका-यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

२. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र. ७७१/९९/व्यय-९, दिनांक १२.७.९९) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(द.शि. फाटक)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए. इमारत,
वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

प्रतिलीपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा वअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा ), मुंबई/नागपूर
६) जिल्हा उपनिबंधक (३), सहकारी संस्था, तळमजला, म्हाडा इमारत,वांद्रे(पूर्व),मुंबई:-५१.
७) सहाय्यक संचालक, नगररचनाव मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
८) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) वित्त विभाग, (व्यय-९),मंत्रालय,मुंबई.
१०) ज-३ कार्यासन, (निवडनस्ती)

(१५४)

क्र. :सी/कार्या-३डी/एल-६०१

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए. इमारत, ३रा मजला,
बांद्रा [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.
दिनांक :- २९.९.९९.

वाचले :- १] शासन, महसूल व वन विभागाकडील हेतुपत्र क्र. एलआरएफ-२६९८/८८४/ प्र.क्र. ७५७८/ज-३, दिनांक ५.५.१९९९.
२] संस्थेचे शपथ पत्र दिनांक १८.५.१९९९.
३] शासन परिपत्रक क्र. एलआरएफ-१०८३/७११३४/प्र.क्र. ३४७८/ज-६, दिनांक ८.२.८३ व शासन परिपत्रक क्र. एलआरएफ-१०८३/७१०५/प्र.क्र. ३५००/ज-६ दि. ११.५.१९८४
४] शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६९८/८८४/ प्र.क्र. ७५७८/ज-३, दिनांक २२.९.१९९९.
५] संस्थेचे हमीपत्र दिनांक २७.९.१९९९.

---

आदेश :-

उपोद्घातात नमूद केलेल्या ज्ञापनानुसार मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे आंबिवली, तालुका अंधेरी येथील स.नं. १४१अ येथील सुमारे १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड दिनांक ८.२.१९८३ व दिनांक ११.५.१९८४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीवर [महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ च्या तरतुदीनुसार] जमिनीचे होणा-या एकूण किंमतीच्या २५% रकमेवर शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. जमीन-१०९७/ २२१४/प्र.क्र. ९३/ज-१, दिनांक ६.८.१९९९ मधील तरतुदीनुसार भुईभाडे आकारून सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळास कम्युनिटी सेंटर उभारण्यासाठी ३० वर्षांच्या भाडे-पट्टीने मंजूर करण्यांत आलेला आहे. त्यानुसार दिनांक १.२.१९७६ चे तात्पुरते मूल्यांकन रु. २००/- प्र.चौ.मी. प्रमाणे होणा-या एकूण बाजारमूल्य रु. ३,०३,१२०/- च्या २५% रकमेवर १२% दराने भुईभाड्याची रक्कम रु. ९,८५१.४० इतकी रक्कम भरणेबाबत कळविल्यानुसार संस्थेने डिमांड ड्राफ्ट द्वारे या कार्यालयांत दिनांक २७.९.१९९९ रोजी भरलेली आहे. तसेच सदर जमिनीचे नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग यांनी निश्चित केलेल्या अंतिम मूल्यांकनाची रक्कम तात्पुरत्या मूल्यांकना-हून जास्त भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह या कार्यालयाने कळविल्यानंतर एका महिन्याच्या आंत भरण्याबाबत रु. २०/- च्या मुद्रांकित पेपर-वर हमीपत्र या कार्यालयांत सादर केलेले आहे. खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती

[दि. १.२.७६ चे तात्पुरते मुल्यांकन रु. २००/- प्रति चौ.मी. मानून त्यानुसार

भाडेपट्टेदार यांचेवर बंधनकारक राहील.

१] भाडेपट्ट्याच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणा करण्यांत येईल.

२] सदर संस्था सर्व जाती धर्मांच्या व्यक्तिंसाठी खुली असली पाहिजे.

३] जमीनीवरील विकासास सीआरझेडच्या तरतुदी बंधनकारक राहतील.

४] संस्थेला जागेचा वापर कम्युनिटी सेंटर व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करता येणार नाही.

५] जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत/केलेल्या सरकारी अधिकारी यांना केव्हाही जमीनीच्या उक्त भागात प्रवेश करुन त्याचे निरीक्षण करण्यास परवानगी देण्यांत संस्था बंधनकारक राहील.

६] भाडेपट्ट्याने देण्यांत आलेली जमीन अथवा भाग कोणासही गहाण, दान, ~~अथवा~~ हस्तांतर अथवा खरेदी व्यवहाराने प्रदान करता येणार नाही.

७] भाडेपट्टा जागेवर कोणताही बदल करणेचा झाल्यास त्याबाबत शासनाची/ जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. जमीनीवरील इमारत आराखडा महापालिकेकडून मंजूर केल्याशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

८] सदरची जमीन शासनांस अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरीता आवश्यक असेल त्यापैकी एक महिन्याच्या नोटीशीने सदरची जागा सरकारजमा करण्यांत येईल व भाडेपट्टा रद्द केला जाईल. याबाबत नुकसान भरपाई अथवा कोणताही दावा करता येणार नाही.

९] शासनाचे धोरणा नुसार भाडेपट्ट्यामध्ये वाढ झाल्यास वाढा भाडेपट्टा भरणेस संस्था जबाबदार राहील.

१०] संस्थेला ज्या प्रयोजनार्थ जमीन मंजूर करण्यांत आलेली आहे त्याच प्रयोजनासाठी जमीन वापरता येईल.

११] भविष्यकाळात जिल्हाधिकारी यांना काही नवीन अटींचा समावेश करणे आवश्यक वाटल्यास त्या अटींचा समावेश करण्याचे स्वातंत्र्य जिल्हाधिकारी यांना राहील व त्या अटी मान्य करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१२] भाडेपट्टेदार यांना करारनामा करुन द्यावा लागेल.

१३] जमीनीवरील इमारत/बांधकाम ताबा मिळाल्यापासून तीन वर्षांत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

१४] भाडेपट्टेदाराने ताबा मिळालेपासून दोन वर्षात किमान एक झाड प्रती

...३/-

(15)

१०० चौ. मी. लावणे व त्याची जोपासना करणे बंधनकारक आहे.

१५) जमीनीवरील खनिज व गौण खनिजाचे हक्क शासनाचे राहतील.

१६) भाडेपट्टेदाराने जिल्हाधिकारी यांचेकडे कायमस्वरुपी डिपॉझिट म्हणून रु. १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) भरणे आवश्यक आहे.

१७) भाडेपट्टेदाराने कोणत्याही शर्तींचा भंग केल्याचे आढळल्यास कोणतीही नुकसान भरपाई न देता जमीन व त्यावरील इमारत पुनर्ग्रहित करणेचे अधिकार शासन/जिल्हाधिकारी यांना राहतील. तदर्थ आदेश पारीत झाल्यापासून जमीन सर्व भार रहित मोकळा ताबा शासन/जिल्हाधिकारी यांना आदेशांत नमूद केलेल्या कालावधीत देणे बंधनकारक राहील.

१८) संबंधित बांधकामाच्या प्रकल्पाचा सविस्तर तपशिल संस्थेने तात्काळ जिल्हाधिकारी यांना देणेचे अटीवर हे आदेश पारीत करणेत येत आहे.

संस्थेने जमीनीचा ताबा घेणेसाठी नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांचेशी संपर्क साधावा.

सही
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रति,

अध्यक्ष,
सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ,
२८३/२, भागिरथी निवास,
तेली गल्ली,
मु. पो. कणकवली,
जिल्हा सिंधुदुर्ग.

प्रतिलिपी -

१) मा. प्रधान सचिव व महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन क्र. एलआर-एफ-२६१९/८८४/प्र.क्र. ७५७८/ज-३, दिनांक २२.९.१९९९ चे संदर्भात माहितीसाठी सादर.

२) तहसिलदार अंधेरी.

२/- त्यांनी मौजे आंबिवली येथील स. नं. १४१-अ मधील १५०० चौ. मी. जमिनीची गा. न. नं. ७/१२ मध्ये जमिनीच्या भाडेपट्ट्याबाबतची नोंद घेऊन ७/१२ उतारा-यासह अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

३) नगर भूमापन अधिकारी अंधेरी.

२/- त्यांनी मौजे आंबिवली येथील स. नं. १४१-अ मधील १५०० चौ. मी.

क्षेत्राचा ताबा संस्थेस देऊन ताबा पावती जागेच्या नकाशाच्या प्रती तसेच भाडेपट्टयाबाबतची नोंद संबंधित मिळकत पत्रिकेत घेऊन मिळकत पत्रिकेच्या उता-यासह अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

Secretary

मे२९९९९

30/9/99

क्रमांक : एलआरएफ२६०१/११५०/प्र.क्र.७२१/ज-३

**महसूल व वन विभाग,**

मंत्रालय, मुंबई - ३२

दिनांक :- २६.५.२००४

**विषय :-** <u>जमीन - मुंबई उपनगर जिल्हा</u>

मौजे आंबिवली स. नं. १४१-अ मधील सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळास मंजूर केलेल्या १५०० चौ.मी. भूखंडालगतचा २०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड संस्थेस मंजूर करणेबाबत.

**वाचा:-** समक्रमांक दिनांक २२.९.१९९९ चे शासन ज्ञापन कृपया पहावे.

**शासन शुध्दीपत्रक :-**

उपरोक्त विषयासंबंधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक- सी /कार्या -२डी /वशि १०३०/०२ दिनांक २८/७/२००३ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, मौजे आंबिवली स.नं.१४१-अ,येथील भू.क्र.१८ ते २०च्या उत्तरेकडील व भूखंड क्र.७५ ते ७७ च्या दक्षिणेकडील दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राच्या लगतचा १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळास दिनांक ८.२.१९८३ व ११.५.१९८४ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीवर समक्रमांक दिनांक २२.९.१९९९ च्या शासन ज्ञापनान्वये कम्युनिटी सेंटरसाठी मंजूर करण्यात आला आहे. तथापि प्रत्यक्षात सदर कम्युनिटी सेंटर खालील भूखंडाचे क्षेत्र १६६९.५ चौ.मी. असल्याने आता संस्थेस अतिरिक्त १६९.५० चौ.मी. क्षेत्र मंजूर करताना देखील शासन निर्णय दि. ११.५.१९८४ मधील तरतुदीनुसार दि. १.२.१९७६ चे तात्पुरते बाजारमूल्य प्रति चौ.मी. रु. २००/- प्रमाणे १६९.५० चौ.मी. क्षेत्राकरिता होणाऱ्या एकूण बाजारमूल्य रु. ३३,९००/- च्या २५ टक्के रकमेवर स..च्या प्राईम लेंडिंग रेटप्रमाणे वार्षिक भुईभाडे आकारुन संस्थेस १६९.५ चौ.मी. क्षेत्र कम्युनिटी सेंटरसाठी मंजूर करण्याचा तसेच सदर १६९.५ चौ.मी.क्षेत्र हे पूर्वी संस्थेस मंजूर केलेल्या भूखंडाचा भाग असल्याने समक्रमांक दिनांक २२.९.१९९९ च्या शासन ज्ञापनात १५०० चौ.मी. ऐवजी १६६९.५ चौ.मी.अशी सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सदर शुध्दीपत्रक नगर विकास विभाग व वित्त विभागाच्या (अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८६/०४/व्यय ९, दि.११.२.२००४) सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( शिवाजी पाटणकर )

अवर सचिव

महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा ... 4 JUN 2004 ... 11409

**प्रति,-**

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा ,

प्रशासकीय इमारत, वांद्रा (पुर्व)मुंबई - ५१.

**प्रतिलिपी :-**
१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
७) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

ORDER %1-3.wpd.wp C:\WINDOWS\Desktop\kondal\LETTER 440

255

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com

क. :-सी/कार्या-३डी/एल-६०१
दिनांक :- १६/६/२००४.

**वाचले :-**

१. शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलआरएफ-२६९८/८८४/प्रक्र.७५७८/ज-३, दिनांक २२/९/१९९९.
२. इकडील आदेश सम क्रमांक दिनांक २९/९/१९९९.
३. शासन, महसूल व वन विभाग पत्र क्र.एलआरएफ-२६०१/११५०/प्रक्र.७२१/ज-३, दिनांक ३१/८/२००१.
४. इकडील पत्र क्र.सी/कार्या-३डी/वशि-१०३०/०१, दिनांक २८/७/२००३.
५. शासन, महसूल व वन विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक २६०१/११५०/प्रक्र.७२१/ज-३, दिनांक २६/५/२००४.

**शुध्दीपत्रक**

उपोद्घातात नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार, मौजे आंबिवली, स.नं.१४१अ. येथील भूखंड क्र.१८ ते २० च्या उत्तरेकडील व भूखंड क्र.७५ ते ७७ च्या दक्षिणेकडील दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राच्या लगतचा १५००चौ.मी. क्षेत्राचा भूखंड दिनांक ८/२/१९८३ व ११/५/१९८४ च्या शासन निर्णयातील अटी व शतीवर (महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सरकारी जमीनींची विल्हेवाट लावणे नियम १९७१ च्या तरतुदीनुसार) शासन ज्ञापन दिनांक २२/९/१९९९ अन्वये कम्युनिटी सेंटरसाठी मंजूर करणेत आला आहे. तथापि, प्रत्यक्षात सदर कम्युनिटी सेंटर खालील भूखंडाचे क्षेत्र १६६९.५चौ.मी. असल्याने, आता संस्थेस अतिरिक्त १६९.५०चौ.मी. क्षेत्र मंजूर करतांना शासन निर्णय दिनांक ११/५/१९८४ मधील तरतुदीनुसार दिनांक १/२/१९७६ चे तात्पुरते बाजारमूल्य प्रती चौ.मी.२००/- (प्रमाणे) १६९.५०चौ.मी. क्षेत्राकरीता होणा-या एकूण बाजारमूल्य ३३,९००/- च्या २५% (टक्के) रक्कमेवर दिनांक १ जानेवारी २००४ च्या १०.२५% या प्राईम लॅडिंग रेट प्रमाणे वार्षिक रु.८६९/- इतके भुईभाडे आकारुन, संस्थेस १६९.५चौ.मी. क्षेत्र कम्युनिटी सेंटरसाठी मंजूर करण्याचा तसेच सदर १६९.५चौ.मी. क्षेत्र हे पूर्वी संस्थेस मंजूर केलेल्या भूखंडाचा भाग असल्याने दिनांक २२/९/१९९९ च्या शासन ज्ञापनांत १५००चौ.मी. ऐवजी १६६९.५चौ.मी. अशी सुधारणा शासन ज्ञापन दिनांक २६/५/२००४ च्या अधीन राहून करणेत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, भाडेपट्टयाचा कालावधी, इकडील आदेश सम क्रमांक दिनांक २९/९/१९९९ मधील मंजूर क्षेत्र १५००चौ.मी. च्या कालावधीशी समांतर राहील.

**अटी/शर्ती :-**

१. उपोदघातातील अ.क्र.१ व २ प्रमाणे कायम रहातील.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

प्रति,
अध्यक्ष,
सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळ,
२८३/२, भागिरथी निवास,
तेली गल्ली, मु.पो.कणकवली,
जिल्हा सिंधुदुर्ग.

**प्रतिलिपी :-**

१) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
३) तहसिलदार अंधेरी यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
४) नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांजकडे पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

२/- नगर भूमापन अधिकारी यांनी, मौजे आंबिवली येथील स.नं.१४१अ मधील १६१.५०चौ.मी. क्षेत्राचा ताबा संस्थेस देऊन ताबा पावती, जागेच्या नकाशाच्या प्रती तसेच भाडेपट्टयाची नोंद संबंधीत मिळकत पत्रिकेत घेऊन मिळकत पत्रिकेच्या उताऱ्यासह अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

स्थळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे

ISSUED
16/6/09